

लैंगिकतेबद्दल बरेच काही
डॉ. संजीवनी कुलकर्णी

# फ्रेंड्स वुईथ बेनिफिट...

नववी-दहावीच्या मुलामुलींशी बोलताना 'फ्रेंड्स विथ बेनिफिट' असा एक नवाच शब्द मला नुकताच कळला. जे एकमेकांचे फ्रेंड्स विथ बेनिफिट असतात त्यांच्यात लैंगिक संबंध असतात, म्हणजे असू शकतात; पण त्यांना बॉयफ्रेंड-गर्लफ्रेंड मात्र म्हटले जात नाही. बॉयफ्रेंड-गर्लफ्रेंड असलेल्यांमध्ये प्रेमाचा आणि पुढे जाऊन एकत्र जगण्याचा असा विचार निदान तात्त्विक पातळीवर तरी गृहीत असतो. 'एफडब्ल्यूबी'मध्ये असे काही नसते. कधी वाटले तर त्या गटातले कुणीही कुणालाही लैंगिक सुखाची विनंती करू शकतात. या मुलांचा एकंदर रागरंग पाहून कुणाच्या तरी चेहऱ्यावर स्पष्ट वाचून घ्यावे असे 'शीः काय हे!!!' उमटले. काही आईबाप-गटातल्यांनी डोक्याला चक्क हातही लावला. मुले पुढे म्हणाली, 'शालेय पातळीवर असल्यापासून बॉयफ्रेंड-गर्लफ्रेंड-फियान्सी वगैरे शब्द वापरणे आम्हाला अगदी चुकीचे वाटते. कारण सहसा त्यातले काही पुढे टिकत नाही. अगदी घरच्यांना सांगून झालेले असते तरी नंतर ब्रेक-अप्स होतातच. क्वचित अशी एखादी जोडी फार तर लग्नाबिग्नापर्यंत पोहोचणार, आणि तीही नंतर दोन वर्षांत डिव्होर्स घेणार. असे घडते हे कुणाला माहीत नसते असेही नाही. आधीच माहीत असताना प्रेमाबिमाचा उगाच खोटा आव आणण्यापेक्षा आमची 'एफडब्ल्यूबी' केव्हाही चांगली कल्पना आहे, त्यात गंडवागंडवी नाही.' या मुलामुलींच्या म्हणण्यातले तथ्य नजरेआड करता येणार नाही. तरीही मनात प्रश्न येतोच, की इतक्या लहान वयात लैंगिक संबंधांच्या जंगलात यांनी घुसावेच कशासाठी? आणि कितीही केले तरी अजून गृहपाठाच्या वह्या लिहिणारी ही मुले, त्यांना अजून लैंगिक संबंधातल्या जबाबदाऱ्यांची पूर्ण जाणीव कशी असणार? तसे विचारल्यावर त्या मुलांनी प्रतिप्रश्न विचारला, 'मोठ्यांनाही जबाबदारीची जाणीव नसते, हे आजवरच्या अनुभवावरून सिद्ध झालेले नाही का? आणि आम्ही काय करावे हे इतर कुणी का ठरवायचे?'

अखेर निर्णय ज्याचा-त्याचाच असला आणि लैंगिकतेच्या बाबतीत जबाबदारी घेणे हे अगदी पौराणिक काळापासून न जमल्याचे दाखले असले तरी विषय तिथे संपत नाही. आपापल्या जीवनातले महत्त्वाचे निर्णय घेण्याचा हक्क ज्याचा त्याचा, हे आजच्या काळाचे ब्रीद आहे, आणि ते तार्किक दृष्टीने योग्यच आहे. मानवी इतिहासाचा विचार करता इतरांच्या निर्णयाचे कासरे आपल्या हातात ठेवण्यात माणसाने आजवर नेहमीच इतिकर्तव्यता मानलेली असली तरी ते योग्य आहे, असे आपण कुणीच म्हणणार नाही. दुसरीकडून पाहिले तर लैंगिक संबंधातली जबाबदारीची जाणीव वय लहान आहे म्हणूनही हातची सुटता कामा नये. एकच घटना दोन बाजूंनी बघितली तर इतकी वेगवेगळी दिसते की, मदत आणि हक्कांवर गदा ही उदाहरणार्थ दोन्हीही विशेषणे तिला लागू पडतात. नुकत्याच आलेल्या बालकांच्या लैंगिक सुरक्षा अधिनियमाचे उदाहरण घ्या. हा कायदा आता संसदेने संमत केलेला आहे. त्या कायद्यानुसार लैंगिक संबंधांचा निर्णय घेण्याचा अधिकार स्त्रियांना वयाच्या अठरा वर्षांपर्यंत नाही. पूर्वी ही मर्यादा सोळा वर्षे होती. मुळात हा कायदा आणि त्यात केला गेलेला बदलही 'मुली घाबरून जाऊन विरोध करू शकल्या नाहीत, तरी तो लैंगिक संबंध त्यांच्या मान्यतेनेच होत होता, असा पुरावा ठरू नये' यासाठी झालेला आहे. त्यामुळे त्या मागचा हेतू सर्वथा स्तुत्य असाच आहे; पण त्याचा वापर पालक त्यांच्या मनाविरुद्ध असलेले लेकीचे संबंध थांबवण्यासाठी करतील, अशी शक्यता या कायद्याला विरोध करणारांनी बोलून दाखवली आहे. किशोरवयीन लैंगिक संबंधांना कायद्याचा सपशेल विरोध आहे, तर अशा कायद्याला आपला विरोध असेल की पाठिंबा यावर नेमका विचार करणे आवश्यक आहे. (संपूर्ण लेख वाचण्यासाठी divymarathi.com या संकेतस्थळाला भेट द्या.)

